SPECIAL OFFERS
ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW
www.abhibee.com

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : १८९ • पुणे • शनिवार, दि. २८ मार्च २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313



## थोडक्यात पण महत्वाचे



### ग्रामपंचायतींना मुद्रांकशुल्क अनुदान तात्काळ द्या : सभापती काकडे

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : हवेली पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतींना मिळणारे मुद्रांकशुल्क अनुदान अद्याप वर्ग न झाल्यामुळे गावपातळीवरील विकासकामे ठप्प झाली असून हे अनुदान तात्काळ वितरित करावे, अशी मागणी सभापती युवराज हिरामण काकडे यांनी केली आहे. त्यांनी याबाबत पुणे जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भूषण जोशी यांना निवेदन दिले आहे. मार्च अखेर जवळ येत असताना निधीअभावी पाणीपुरवठा, रस्ते, वीज, स्वच्छता तसेच विविध पायाभूत सुविधांची कामे रखडली आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतींना नियोजित कामांना गती देणे कठीण झाले असून ग्रामपंचायतींकडून पंचायत समितीकडे वारंवार विचारणा होत आहे. राज्य शासनाच्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान'ची मुदत ३१ मार्च २०२६ रोजी संपत असल्याने, या अंतर्गत सुरू असलेल्या योजनांची वेळेत अंमलबजावणी होण्याबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर हवेली तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या खात्यावर प्रलंबित मुद्रांकशुल्क अनुदान तात्काळ वर्ग करण्याची मागणी करण्यात आली असून, पंचायत विभागाकडून त्वरित कार्यवाही करावी, अशी विनंतीही करण्यात आली आहे.

- निधीअभावी विकासकामे ठप्प; जिल्हा परिषदेकडे निवेदनाद्वारे मागणी

### एजंटिक एआयमध्ये सर्टिफिकेट प्रोग्राम

पुणे (आरंभ पर्व) : आघाडीची ग्लोबल एडटेक कंपनी असलेल्या ग्रेट लर्निंग ने जॉन्स हॉपकिन्स व्हाईटिंग स्कुल ऑफ इंजिनिअरींगच्या सहकार्याने सर्टिफिकेट प्रोग्राम इन एजंटिक एआय सुरू केला आहे.हा 16 आठवड्यांचा ऑनलाइन प्रोग्राम असून जॉन्स हॉपकिन्स इंजिनिअरींगमधील प्राध्यापक आणि उद्योग व्यावसायिकांनी डिझाईन केलेला हा अभ्यासक्रम आहे.


याहवी बरई | महेश्वरी रणसुभे | मीनल परटे

### विद्यार्थ्यांच्या मेहनतीला यशाची उज्ज्वल : प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया

पुणे (आरंभ पर्व) : सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स, कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, पुणे येथील बॅचलर ऑफ फिजिओथेरपी (बीपीटी) अभ्यासक्रमाच्या पहिल्या बॅचने नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या वार्षिक परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अंतिम वर्षाच्या तुकडीचा शंभर टक्के निकाल लागला आहे. संस्थेच्या इतिहासातील हा अभिमानास्पद टप्पा असून, पहिल्याच बॅचने उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीची परंपरा निर्माण केली आहे. या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत विशेष प्रावीण्य मिळवले. यामध्ये याहवी बरई हिने ७५.२५ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. महेश्वरी रणसुभे हिने ७४.८७ टक्के गुणांसह द्वितीय, तर मीनल परटे हिने ७३.२५ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया यांच्यासह प्राचार्या डॉ. सिमी रेठरेकर यांनी विद्यार्थ्यांचे, पालकांचे तसेच शिक्षकवर्गाचे अभिनंदन केले. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "सूर्यदत्त कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या पहिल्या बॅचने मिळवलेला १०० टक्के निकाल हा आमच्यासाठी अभिमानास्पद क्षण आहे. हे यश विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे, प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाचे आणि संस्थेतील शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरणाचे फलित आहे. सक्षम, कुशल आणि संवेदनशील आरोग्यसेवा व्यावसायिक घडविण्याची आमची बांधिलकी यामुळे अधिक दृढ झाली आहे. सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स, कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, पुणे हे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्न असून, फिजिओथेरपी क्षेत्रात उच्च दर्जाचे शिक्षण, सुसज्ज क्लिनिकल प्रशिक्षण आणि संशोधनाच्या विविध संधी उपलब्ध करून देते."

### विद्यार्थ्यांनी अनुभवली विमानशास्त्राची रोमांचक व अद्भुत सफर



पुणे (आरंभ पर्व) : कागदी, लाकडी विमानाच्या प्रतिकृती, प्राचीन काळापासून आजच्या आधुनिक जेटपर्यंतच्या विमानांचा इतिहास, त्यामागील शास्त्र समजून घेत विद्यार्थ्यांनी विमानशास्त्राची रोमांचक व अद्भुत सफर अनुभवली. विज्ञानाची ओढ, आकाशाच्या गूढतेची उत्सुकता मनात बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पाषाण येथील एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडिया पुणे शाखेतर्फे शास्त्रवाहिनीच्या सहकार्याने आयोजित 'सायन्स ऑफ फ्लाइट' प्रदर्शनाला विद्यार्थ्यांसह पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पाषाण येथील अरोमी लॉन्समध्ये आयोजित हे प्रदर्शन उद्या शनिवारपर्यंत (ता. २८) सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन पाषाण येथील एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडिया (एईएसआय) पुणे शाखेचे व्हाईस चेअरमन आणि आर्मामेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंटचे (एआरडीई) संचालक एम. व्ही. रमेश कुमार, पुणे जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी निलेश धनापुने, शास्त्रवाहिनीचे संस्थापक व एरोमॉडेलर माधव खरे, 'एईएसआय'चे सचिव ए. आनंद राज, सहसचिव डॉ. एल. के. गीते आदी उपस्थित होते.

# 'लव्ह जिहाद' जनजागृती रथ ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

## तरुणींना सावध राहण्याचा संदेश




**विशेष वृत्त : सौ. सुरेखा सावंत-मते**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरात आयोजित करण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेत "लव्ह जिहाद" या विषयावर आधारित जनजागृती रथाने नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. सामाजिक जागरूकतेचा संदेश देणाऱ्या या रथामुळे उपस्थितांमध्ये चर्चा रंगताना दिसली.

या रथाच्या माध्यमातून विशेषतः तरुणींना कोणत्याही नात्यात विचारपूर्वक निर्णय घेण्याचा आणि सावध राहण्याचा संदेश देण्यात आला. सोशल मीडियाच्या वाढत्या वापराच्या पार्श्वभूमीवर अनोळखी व्यक्तींशी जुळणाऱ्या नात्यांमध्ये सतर्कता बाळगण्याचे महत्त्व या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आले.

रथावर एका मुलीच्या आयुष्यातील टप्प्यांचे चित्रमय सादरीकरण करण्यात आले होते. सुरुवातीला कॉलेज जीवन, मित्रमैत्रिणींसोबतचे संवाद, त्यानंतर सोशल मीडियावरून होणारी ओळख, नात्यांची वाढ आणि शेवटी उद्भवू शकणारे धोके अशा टप्प्यांमधून संपूर्ण कथा उभी करण्यात आली होती.

या चित्रांमधून "सतर्क रहा, सुरक्षित रहा" हा संदेश ठळकपणे मांडण्यात आला. दृश्यात्मक पद्धतीमुळे अनेकांनी हा संदेश सहज समजून घेतला आणि रथाभोवती मोठी गर्दीही पाहायला मिळाली.

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडियाच्या माध्यमातून ओळखी झपाट्याने वाढत आहेत. मात्र, अशा नात्यांमध्ये अनेकदा धोकेही दडलेले असू शकतात. याच पार्श्वभूमीवर या रथातून युवक-युवतींना विचारपूर्वक निर्णय घेण्याचे आवाहन करण्यात आले. या उपक्रमाबाबत आयोजकांनी स्पष्ट केले की, रथाचा उद्देश कोणत्याही धर्माविरोधात भावना निर्माण करणे नसून, तरुण पिढीमध्ये जागरूकता निर्माण करणे हा आहे. "नातेसंबंधांमध्ये विश्वास आणि विचार आवश्यक आहे. केवळ भावनेच्या भरात घेतलेले निर्णय आयुष्य बदलू शकतात," असे त्यांनी सांगितले.

या रथाला नागरिकांकडून मिश्र प्रतिसाद मिळाला. काहींनी हा उपक्रम सामाजिक जागरूकतेसाठी आवश्यक असल्याचे म्हटले, तर काहींनी अशा विषयांवर संतुलित आणि संवेदनशील चर्चा होण्याची गरज व्यक्त केली.

एकूणच, या शोभायात्रेतील जनजागृती रथाने सामाजिक मुद्द्यावर लक्ष वेधून घेतले असून, तरुणांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. बदलत्या काळात नातेसंबंधांबाबत सजग राहण्याचा संदेश देणारा हा उपक्रम चर्चेचा विषय ठरला आहे.

# दौंडमध्ये अवैध पिस्तूल प्रकरणी दोघे ताब्यात; एक फरार

## रेल्वे ग्राउंड परिसरात पोलिसांची कारवाई; ८० हजारांचे पिस्तूल जप्त

**दौंड (दै. आरंभ पर्व)**

दौंड शहरातील हुतात्मा चौक आणि रेल्वे ग्राउंड परिसरात अवैध पिस्तूल बाळगणाऱ्या संशयितांवर पोलिसांनी कारवाई करत दोघांना ताब्यात घेतले असून एक आरोपी फरार झाला आहे. ही कारवाई २६ मार्चच्या रात्री करण्यात आली.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक प्रमोद शिरसागर व गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांच्या पथकाने सापळा रचला.




यावेळी इरफान उर्फ शेरखान शब्बीर खान (वय २२) आणि विशाल प्रकाश काटकर (वय ३०) यांना ताब्यात घेण्यात आले. तर सोनू उर्फ बिल्ला उर्फ पद्माकर शांताराम ताडे हा आरोपी पोलिसांना चकवा देत फरार झाला आहे. कारवाईदरम्यान संशयितांकडून सुमारे ८० हजार रुपये किमतीचे पिस्तूल जप्त करण्यात आले आहे. फरार आरोपीचा शोध पोलिसांकडून सुरू असून, या कारवाईमुळे परिसरातील गुन्हेगारी प्रवृत्तीवर अंकुश बसण्यास मदत होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# ई-वाहनांवर कर नाही, तरीही नोटिसा; आरटीओची चूक उघड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्य शासनाने ३१ मार्च २०३० पर्यंत इलेक्ट्रिक वाहनांना मोटार वाहन करातून संपूर्ण सूट दिली असतानाही पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) अशा वाहनधारकांनाही थकीत कराच्या नोटिसा पाठविल्याचा प्रकार समोर आला आहे. या चुकीमुळे वाहन मालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून, संबंधित नोटिसा अखेर रद्द करण्यात आल्याचे आरटीओ प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून एसएमएसद्वारे थकीत कर भरण्याबाबत विविध वाहनधारकांना नोटिसा पाठविण्यात आल्या. मात्र, त्यामध्ये इलेक्ट्रिक वाहनांचाही समावेश झाल्याने अनेक वाहन मालक गोंधळात पडले. काहींनी याबाबत थेट आरटीओ कार्यालयाशी संपर्क साधत चौकशी केली. दरम्यान, महाराष्ट्र इलेक्ट्रिक धोरण २०२५ अंतर्गत २३ मे २०२५ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील नोंदणीकृत सर्व इलेक्ट्रिक वाहनांना ३१ मार्च २०३० पर्यंत मोटार वाहन करातून पूर्ण सूट देण्यात आली आहे. त्यामुळे अशा वाहनधारकांनी कोणताही थकीत कर भरण्याची आवश्यकता नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

# पत्रकारांवरील हल्ल्याचा राष्ट्रवादी काँग्रेसकडून तीव्र निषेध

**चिपळूण-विलास गुरव (दै. आरंभ पर्व)**

- पोलीस प्रशासनाला दिले निवेदन

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाका परिसरात दिनांक २५ मार्च रोजी पत्रकारांना झालेल्या मारहाणीच्या घटनेने चिपळूण तालुक्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला असून, दोषींवर तातडीने व कठोर कायदेशीर कारवाई व्हावी, या मागणीसाठी उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

तालुकाध्यक्ष नितीन (आबू) चंद्रकांत ठसाळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पोलीस प्रशासनाची भेट घेऊन आपले गाऱ्हाणे मांडले. यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, "चिपळूण हे एक सुसंस्कृत आणि शांतताप्रिय शहर म्हणून ओळखले जाते. अशा शहरात लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारांवर हल्ला होणे, ही अत्यंत निंदनीय आणि अशोभनीय बाब आहे. या घटनेमुळे संपूर्ण शहरात संतापाची लाट असून, समाजात वावरणाऱ्या गुंड प्रवृत्तींना कायद्याचा धाक असणे आवश्यक आहे." या प्रकरणी पोलिसांनी आधीच गुन्हा दाखल केला असला, तरी या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्षपातीपणे चौकशी व्हावी, अशी आग्रही मागणी पक्षाच्या वतीने करण्यात आली. भविष्यात अशा प्रकारच्या हिंसक घटनांची पुनरावृत्ती होऊ नये आणि गुन्हेगारांना योग्य ती शिक्षा मिळावी, जेणेकरून पुन्हा असे कृत्य करण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही, असेही ठसाळे यांनी यावेळी नमूद केले.

# अंधश्रद्धा वाढणे हे शासनाचे अपयश; भोंदूगिरीला राजाश्रयाचा आरोप

## काँग्रेसची टीका



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यात अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीचे वाढते प्रमाण हे शासनकर्त्यांच्या अपयशाचे द्योतक असल्याची घणाघाती टीका काँग्रेसचे वरिष्ठ राज्य प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केली. पुणे येथील काँग्रेस भवनात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही भूमिका मांडली. तिवारी म्हणाले की, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काँग्रेस सरकारने कायदा केला असला, तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी, जनजागृती आणि प्रबोधनाचा अभाव असल्यामुळे आजही समाजातील अनेक निष्पाप लोक, विशेषतः महिलावर्ग, भोंदूगिरीचे बळी ठरत आहेत. "अंधश्रद्धा फोफावणे म्हणजे शासन व्यवस्थेचा अंकुश कमी झाल्याचे लक्षण आहे," असे ते म्हणाले. फडणवीस सरकारच्या काळात अंधश्रद्धा विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी कमी झाल्याचा आरोप करत तिवारी यांनी सांगितले की, या कायद्याचा प्रचार-प्रसार आणि जनजागृती याकडे शासनाने दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे समाजात बुवाबाजी आणि पाखंडी प्रवृत्तींचे प्रस्थ वाढत आहे. ते पुढे म्हणाले की, जेव्हा लोकांच्या अडचणी वाढतात आणि सरकारी यंत्रणेवर विश्वास कमी होतो, तेव्हा लोक झटपट उपायांच्या शोधात अंधश्रद्धेकडे वळतात. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव आणि प्रशासनाकडून योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे अशा प्रवृत्ती वाढीस लागतात. भोंदूबाबा प्रकरणांचा संदर्भ देत तिवारी यांनी प्रश्न उपस्थित केला की, अशा प्रकरणांवर शासन आणि पोलिस यंत्रणा किती प्रभावी कारवाई करते? "काही प्रकरणांत उलट माध्यमांनाच दबावाखाली आणण्याचे प्रकार घडले," असा आरोप त्यांनी केला. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आगरकर यांनी दिलेल्या वैज्ञानिक व विवेकनिष्ठ विचारांची आठवण करून देत तिवारी म्हणाले की, भारतीय राज्यघटनेतही वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावाद जोपासण्याचे कर्तव्य नमूद आहे. अंधश्रद्धा आणि जादूटोणा विरोधी कायद्याबाबत व्यापक जनजागृती करणे, नागरिकांना वैज्ञानिक विचारसरणीकडे प्रवृत्त करणे आणि भोंदूगिरीवर कठोर कारवाई करणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या पत्रकार परिषदेला सुभाष थोरवे, भोला वांजळे, तात्या शिर्के, आबा जगताप, गणेश मोरे, राजेश सुतार, संजय अभंग, सुभाष जेधे, गणेश शिंदे, उदय लेले, नरेश आवटे आदी उपस्थित होते.

# चार जिल्हा परिषद शाळांमध्ये 'ग्रीन स्कूल' प्रकल्पाचे लोकार्पण



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील शाळांना पर्यावरणपूरक बनविण्याच्या उद्देशाने टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सीएसआर निधीतून आणि सस्टेनाबिलिटी इनिशिएटिव्हज यांच्या माध्यमातून चार जिल्हा परिषद शाळांमध्ये ग्रीन स्कूल प्रकल्पाचे लोकार्पण नुकतेच झाले. खेड तालुक्यातील बिरदवाडी, देशमुखवाडी, तोरणे आणि रानमळा (कडूस) येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून शाळांमध्ये पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा निर्माण करून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षण, ऊर्जा बचत आणि शाश्वत जीवनशैली याबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या ग्रीन स्कूल प्रकल्पांतर्गत शाळांमध्ये सोलर ऊर्जा प्रणाली, रेन वॉटर हार्वेस्टिंग व्यवस्था, ओल्या कचऱ्यासाठी खत निर्मिती यंत्र, तसेच इनडोअर व आउटडोअर वृक्षारोपण करण्यात आले आहे. पाणी संवर्धनासाठी शाळांमध्ये लो-फ्लो वॉटर टॅप्स बसविण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वर्षभर पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यासाठी ग्रीन कॅलेंडर शाळांना देण्यात आले आहे. शाळेतील सर्व हरित उपक्रमांची देखभाल व अंमलबजावणी करण्यासाठी विद्यार्थ्यांची 'ग्रीन आर्मी' तयार आहे. विद्यार्थ्यांना विज्ञान व पर्यावरण विषयाची आवड निर्माण व्हावी यासाठी सायन्स पार्क भेट, तसेच पर्यावरण संवर्धन, अग्निसुरक्षा आणि जैवविविधता ओळख या विषयांवर मार्गदर्शन व कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या.

सस्टेनाबिलिटी इनिशिएटिव्हजच्या अपूर्वा कुलकर्णी म्हणाल्या, "पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आमची संस्था नेहमीच पुढाकार घेत असते. शासकीय शाळांना हरित शाळांमध्ये रूपांतरित करण्याच्या उद्देशाने या प्रकल्पाची सुरुवात झाली.

# विद्यार्थ्यांवर भारताला 'जगाचे गुरुस्थान' मिळवून देण्याची जबाबदारी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एकेकाळी सुवर्ण भारत म्हणून ओळखला जाणारा देश पुन्हा नव्याने घडवून त्याला जगाचे गुरुस्थान प्राप्त करून देण्याची जबाबदारी आजच्या विद्यार्थी वर्गावर आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांनी केले. विद्यार्थ्यांनी कोणत्याही क्षेत्रात करिअर घडवताना राष्ट्रनिष्ठा आणि कामावरील निष्ठा अबाधित ठेवावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. रमणबाग प्रशालेत जागतिक रंगभुमी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बलकवडे आणि उद्योजक डॉ. दिलीप देशपांडे यांच्या हस्ते सदानंद अचवल यांच्या स्मरणार्थ नाट्य क्षेत्रातील उल्लेखनीय विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. हे पुरस्कार अमेरिकास्थित अनिल प्रयाग यांनी प्रायोजित केलेले आहेत. यावेळी 'नाट्य आराधना' पुरस्काराने इयत्ता सहावीतील अमोघ किरण कुलकर्णी, तर 'नाट्य प्रेरणा' पुरस्काराने इयत्ता दहावीतील गौरव विशाल जगताप यांचा सन्मान करण्यात आला. तसेच राज्य नाट्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवलेल्या 'माय सुपर हिरो' या नाटकातील विद्यार्थ्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात बोलताना बलकवडे यांनी कला ही व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यावश्यक असल्याचे सांगितले. "कला माणसाचे जीवन समृद्ध करते आणि ती प्रभावी संवादाचे साधन आहे. भारताला ६४ कलांची परंपरा लाभली असून नव्या पिढीने ती अधिक समृद्ध करावी," असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. दिलीप देशपांडे यांनी नाटकाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, "नाटक हा समाजाचा आरसा आहे. समाजातील चांगल्या-वाईट गोष्टींचे प्रभावी चित्रण नाटकातून करता येते. ही जिवंत कला असल्याने कलाकारांकडे समयसूचकता आणि एकाग्रता अत्यावश्यक असते." कार्यक्रमाची सुरुवात तनय नाझीरकर यांनी सादर केलेल्या नांदीने झाली. उपमुख्याध्यापक महेश जोशी यांनी प्रास्ताविक व आभार प्रदर्शन केले. अचवल यांचे वर्गमित्र दिलीप परदेशी यांनी अचवल यांच्या आठवणींना उजाळा दिला, तर दीप्ती डोळे यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाला शाळा समितीचे अध्यक्ष डॉ. शरद आगरखेडकर, पर्यवेक्षिका अंजली गोरे, मंजुषा शेलूकर, नाट्यछंद विभागाचे प्रमुख रवींद्र सातपुते यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि १९६३ च्या मॅट्रिक बॅचमधील अचवल यांचे अनेक वर्गमित्र उपस्थित होते.


जागतिक रंगभूमी दिनानिमित्त सदानंद अंचवल स्मृती पुरस्कारांचे वितरण






दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शनिवार, दि. २८ मार्च २०२६








## थोडक्यात पण महत्वाचे



### Ola Electric ची '#EndICEAge' मोहीम; EV फक्त ₹४९,९९९ पासून

• ₹५० हजारांपर्यंत फायदे, 'सर्व्हिस ट्रस्ट' व 'बायबॅक' गॅरंटी; ऑफर ३१ मार्चपर्यंत

बंगळुरू (आरंभ पर्व) : Ola Electric ने '#EndICEAge' ही नवी मोहीम सुरू करत इलेक्ट्रिक वाहनांना अधिक परवडणारे बनवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. कंपनीने आपल्या Gen 3 S1 X (2kWh) आणि Roadster X (2.5kWh) ही मॉडेल्स केवळ ₹४९,९९९ पासून उपलब्ध करून दिली असून संपूर्ण पोर्टफोलिओवर ₹५०,००० पर्यंतचे फायदे जाहीर केले आहेत. ही ऑफर ३१ मार्च २०२६ पर्यंत वैध आहे. ग्राहकांचा विश्वास वाढवण्यासाठी कंपनीने 'सर्व्हिस ट्रस्ट गॅरंटी' सादर केली आहे. यानुसार सेवा देण्यात विलंब झाल्यास ग्राहकांना मोफत Ola कॅब व्हाउचर्स दिले जाणार आहेत. तसेच 'बायबॅक गॅरंटी' अंतर्गत वाहनाच्या भविष्यातील ६०% पर्यंत मूल्याची हमी देण्यात आली आहे. सर्व वाहनांवर ८ वर्षांची विस्तारित वॉरंटीही देण्यात येणार आहे. Ola Electric चे सीईओ भाविश अग्रवाल यांनी सांगितले की, वाढत्या इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर इलेक्ट्रिक वाहनांकडे वळणे ही काळाची गरज आहे. या मोहिमेद्वारे अधिकाधिक भारतीय ग्राहकांना EV स्वीकारण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा कंपनीचा उद्देश आहे. Ola च्या स्कूटर्समध्ये ३२० किमीपर्यंत रेंज, तर मोटरसायकलमध्ये ५०० किमीपर्यंत रेंज, ० ते ४० किमी वेग २.१ सेकंदात आणि १४१ किमी/तास कमाल वेग अशी प्रगत वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत. MoveOS 5 मुळे सतत OTA अपडेट्सही मिळणार आहेत. कंपनीकडून S1 Pro, S1 X आणि Roadster X अशा विविध मॉडेल्सची विस्तृत श्रेणी बाजारात उपलब्ध असून, किफायतशीर किंमत आणि प्रगत तंत्रज्ञानामुळे EV बाजारात स्पर्धा अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

### फेब्रुवारीमध्ये पुण्यात १५,५००+ मालमत्ता नोंदणी: नाइट फ्रँक इंडिया

पुणे (आरंभ पर्व) : नाइट फ्रँक इंडियाच्या ताज्या मूल्यमापनानुसार पुण्याच्या निवासी मालमत्ता बाजारात फेब्रुवारी 2026 मध्ये 15,579 नोंदणी झाल्या असून, त्यातून 708 कोटींचा मुद्रांक शुल्क महसूल प्राप्त झाला. वर्षानुवर्षांच्या (YoY) आधारावर, फेब्रुवारी 2025 मधील 19,025 युनिट्सच्या तुलनेत नोंदणीत 18% घट झाली; मात्र मुद्रांक शुल्क संकलन अधिक स्थिर राहिले आणि ते केवळ 1% नी कमी होऊन 713 कोटींवरून घसरले. हा फरक उच्च-मूल्याच्या मालमत्तांकडे होत असलेल्या सततच्या झुकावाचे प्रतिबिंब दर्शवतो. क्रमिक (MoM) आधारावर, दोन्ही निर्देशांकांमध्ये सुधारणा दिसून आली. जानेवारी 2026 मधील 14,537 च्या तुलनेत नोंदणी 7% ने वाढली, तर मुद्रांक शुल्क संकलन 609 कोटींवरून 16% ने वाढले. 1 कोटीपेक्षा कमी किमतीच्या घरांचा व्यवहारांमध्ये अजूनही सर्वाधिक वाटा आहे; मात्र मागणीची रचना मध्यम-मूल्य आणि प्रीमियम विभागांकडे वळली आहे. 50 लाख–1 कोटी विभागाचा वाटा फेब्रुवारी 2026 मध्ये 29% पर्यंत वाढला, जो वर्षभरापूर्वी 27% होता, तर 1–2.5 कोटी श्रेणी 12% वरून 15% पर्यंत वाढली.






# चाकणकरांचा प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा

## आयोगाच्या सर्व १९ शिफारशी कागदावर : कार्यकाळ फक्त प्रसिद्धीचा, फसवे दावे अन पोकळ घोषणा

**नाशिक (दै. आरंभ पर्व)**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरातला बलात्काराच्या आरोपाखाली अटक झाली असून एसआयटी पुढील चौकशी करत आहे. मात्र, याच अशोक खरातची पाद्यपूजा करताना रुपाली चाकणकर यांचे काही फोटो समोर आले होते. त्यामुळे विरोधकांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. त्यानंतर रुपाली चाकणकरांनी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर आता राष्ट्रवादी (अजित पवार) महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचाही रुपाली चाकणकर यांनी राजीनामा दिला आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनाम्यानंतर रुपाली चाकणकर यांना राष्ट्रवादी महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा द्यावा लागल्यामुळे त्यांना अशोक खरात प्रकरण चांगलंच भोवलं असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. दरम्यान, या राजीनाम्याबाबत रुपाली चाकणकर यांनी एक्सवर (ट्विटर) पोस्ट करत माहिती दिली आहे. "खरात प्रकरणाबाबत पहिल्या दिवशीच मी माझी भूमिका स्पष्ट केली आहे. त्याच्या आर्थिक व्यवहारात, त्याच्या गैरकृत्यात दुरान्वये संबंध नाही, आजही तीच स्पष्ट व ठाम भूमिका आहे. तपासादरम्यान या सर्व बाबी निष्पन्न होतीलच. खोटे, असत्य व कुठलाही पुरावा नसताना जे आरोप माध्यमांमधून होत आहेत, ते वेदनादायक आहे. सत्य प्रखरतेने सिद्ध होईलच. हा तपास पारदर्शकपणे व निष्पक्षपणे व्हावा, ही माझी मागणी मी यापूर्वीच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पोलीस महासंचालक यांच्याकडे केली आहे. आज सकाळी फोनद्वारे आदरणीय सुनेत्रावहिनी पवार यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार मी माझ्या राष्ट्रवादी महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देत आहे", असं रुपाली चाकणकर यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. स्वयंघोषित भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाने महाराष्ट्रासह देशाला हादरवून सोडलं आहे. धार्मिक विधीच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण केल्याच्या आरोपाखाली त्याला अटक करण्यात आली आहे. खरातच्या सेक्स स्कँडलने राज्यात खळबळ माजवली असताना रोज या प्रकरणी नवीन खुलासे समोर येत आहेत.



### महिला सन्मान पोर्टल बंद

**नुकत्याच झालेल्या महिला दिनी आयोगाच्या वतीने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी महिला सन्मान पोर्टल कार्यन्वीत झाल्याचे जाहीर केले. सर्व पोलीस स्टेशनशी पोर्टल जोडले असून महिलांना घरातून तक्रार नोंदवता येईल, असे स्पष्ट केले. प्रत्यक्षात आयोगाचे असे कोणते पोर्टल अद्याप कार्यरत झालेले नाही.**

**भोंदू अशोक खरात लैंगीक प्रकरणी नुकताच राजीनामा दिलेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी चार वर्षातील अध्यक्षपदाच्या कार्यकाळात राज्य सरकारला महिलांसाठीच्या तब्बल १९ शिफारशी केल्या होत्या. मात्र सूचनावजा असलेल्या या शिफारशींमागे अभ्यास, संशोधन, आकडेवारी याचा कोणताही ठोस असा आधार नसल्याने त्या सर्व शिफारशी कागदावरच राहिल्या आहेत. चाकणकर यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातून राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली होती. आयोगाकडे वर्षाला १० हजार महिलांच्या तक्रारी येतात आणि प्रलंबित ५ हजार तक्रारी असतात. तक्रारीवर त्वरित निर्णय घेण्याचे चाकणकर यांचे आदेश होते. समुपदेशनाचा तक्रारी सोडवण्यात महत्वाचा वाटा असतो. पण चाकणकर यांचे संबंधित पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदवण्याचे व तपास जलद करण्याचे पत्र पाठवण्याला चार वर्षे प्राधान्य राहिले. त्यामुळे तक्रारी निकाली काढल्याचे प्रमाण जरी अधिक असले तरी आयोगाच्या कार्यपद्धतीचा पिडीत महिलांना फटका बसला. ऊस तोड महिलांसाठी जिल्हा समिती स्थापना करा, गावात बालविवाह झाल्यास सरपंच व ग्रामसेवकांना निलंबीत करा, महिलांशी संबंधीत सायबर गुन्ह्यात पोलीसांनी स्वाधिकारे तक्रारी नोंदवाव्यात, तालुकास्तरावर भरोसा सेल स्थापन करावेत, महिला दिनी महिलांच्या ग्रामसभांचे आयोजन करावे, जिल्हावार विवाह समुपदेशन केंद्र असावे आदी चाकणकर यांनी सरकारला १९ शिफारशी केल्या. मात्र त्यातील कामाच्या ठीकाणी होणाऱ्या लैंगीक छळप्रतिबंधक समित्यांचा आढावा घेण्याबाबत एक शिफारस राज्य सरकारने स्वीकारल्याचे दिसते. चाकणकर यांच्या पूर्वी आयोगाने सरकारकडे अनेक शिफारशी केलेल्या आहेत. पंतप्रधान उज्वला योजनेचा महाराष्ट्रातील अभ्यास, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पत्नींचा अभ्यास, 'सक्षमा' (ॲसिड हल्ल्यातील पीडितांना मदत), 'प्रज्वला' (स्वयं-सहायता गटांना केंद्र सरकारच्या योजनांशी जोडणे), कारागृहातील महिला कैद्यांना मिळणाऱ्या सोई असे प्रकल्प राबवले आणि त्यावर शासनाने सुसंगत असे चांगले निर्णय घेतले. चाकणकर यांच्या दोन टर्मच्या कार्यकाळात असे यश महिला आयोगाला मिळाले नाही. आयोगाला वार्षिक ६ कोटी निधी प्राप्त होत होता. पैकी ३ कोटी वेतनावर आणि ३ कोटी वेतनेतर खर्ची पडत होते. प्रत्यक्षात मात्र जनसुनावण्या, चर्चासत्रे, दौरे यापेक्षा आयोकडून काही ठोस असे काम झाले नाही. मागच्या चार वर्षात राज्य महिला आयोग केवळ समाजमाध्यावर सक्रीय होता.**

## ५ एप्रिल रोजी कमर्शियल पायलट लायसन्स मेगा सेमिनार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विमानवाहतुकीत करिअर करण्याची इच्छा असलेल्या तरुणांसाठी सुवर्णसंधी उपलब्ध झाली असून यंग लर्नर्स एव्हिएशन अकॅडमी आणि सरसंघचालक डॉ. बाळासाहेब देवरस एव्हिएशन गॅलरी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने "पायलट ॲप्टिट्यूड टेस्ट व कमर्शियल पायलट लायसन्स" या विषयावर मेगा सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे. या सेमिनारची माहिती पुणे महानगरपालिका सरसंघचालक डॉ. बाळासाहेब देवरस एव्हिएशन गॅलरी येथे आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी कॅप्टन नितीन बेंद्रे, यंग लर्नर्स एव्हिएशन अकॅडमीच्या संचालक रश्मी इंदुलकर, तसेच सरसंघचालक डॉ. बाळासाहेब देवरस एव्हिएशन गॅलरीचे व्यवस्थापक सुजित शेंडकर उपस्थित होते. नितीन बेंद्रे म्हणाले,"सदर सेमिनार रविवार, ५ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता शिवाजीनगर गावठाण येथील एव्हिएशन अँड स्पेस म्युझियम येथे आयोजित करण्यात आली आहे. या सेमिनारमध्ये विद्यार्थ्यांना तज्ज्ञांचे मार्गदर्शन, पायलट प्रशिक्षणाची माहिती, तसेच शिक्षण कर्जासंदर्भात सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे . भारतासह अमेरिका, फिलिपाईन्स, युरोप व दक्षिण आफ्रिका येथे प्रशिक्षणाच्या संधींबाबतही यावेळी माहिती देण्यात येणार आहे. एकंदरीत या क्षेत्रात विद्यार्थ्यांना आणि पालकांना वाटणाऱ्या सगळ्या शंकचे निरसन करण्यात येणार आहे. पायलट प्रशिक्षणाची संपूर्ण प्रक्रिया, तसेच एव्हिएशन क्षेत्रातील देश-विदेशातील करिअर संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले." रश्मी इंदुलकर म्हणाल्या, " आज या क्षेत्रात जागतिक आणि स्थानिक पातळीवरील नोकरीच्या संधींची माहिती मिळाल्याने विद्यार्थ्यांना करिअर नियोजन अधिक सोपे होणार आहे.



## एनर्जी फिटनेस सिरीज 'फेमसली फिट' चर्चेत

### फेमसली फिट'चे ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर आता मोफत स्ट्रिमिंग, दर शुक्रवारी नवीन एपिसोड पाहता येणार

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

ॲमेझॉन एमएक्स प्लेयर या भारतातील आघाडीची विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात-समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवेने आज फिटनेस शो फेमसली फिट हा एक पूर्णपणे नवीन साप्ताहिक फिटनेस आणि जीवनशैली शो प्रदर्शित केला. सोफी चौधरी ने सूत्रसंचालन केलेल्या या सहा एपिसोडच्या सिरीजमध्ये तंदुरुस्ती, प्रसिद्धी आणि स्पष्ट संभाषण निराळीच उंची गाठणार. ज्यामुळे प्रेक्षकांना भारतातील काही सर्वात लोकप्रिय सेलिब्रिटींमागील दिनचर्या आणि कथांवर एक अनफ़िल्टर्ड दृष्टीकोन मिळतो.

प्रत्येक भागामध्ये एक ए-लिस्ट सेलिब्रिटी रेड कार्पेटपासून दूर जाऊन एका वर्कआऊट सेटअपमध्ये पाऊल ठेवतो. या सिरीजची सुरुवात आज देशातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या अभिनेत्रींपैकी एक, क्रिती सॅनन, त्यानंतर फिटनेस आयकॉन आणि सदाबहार मलायका अरोरा तसेच प्रचंड लोकप्रिय आणि कायम प्रेक्षक पसंतीस उतरलेली सोनम बाजवा यांच्याद्वारे होते. या श्रेणीमध्ये गझल अलघ (सह-संस्थापक, होनासा कन्ड्युमर लिमिटेड) यांचाही समावेश असून आणखी काही रोमांचक नावे लवकरच या श्रेणीत दाखल होणार आहेत. योग आणि सामर्थ्य प्रशिक्षणापासून ते कार्यात्मक तंदुरुस्तीपर्यंत, प्रेक्षकांना प्रामाणिक दिनचर्या, वैयक्तिक शिस्त आणि लोकांच्या नजरेत तंदुरुस्त राहण्याची वास्तविकता जवळून उपलब्ध होते. 'फेमसली फिट' ख्यातनाम व्यक्तींच्या स्पष्ट अंतर्दृष्टीचा वापर करते, सामान्य तंदुरुस्तीभोवती असलेल्या दंतकथांचे खंडन करते आणि त्यांचे अधूनमधून होणारे चॅट किंवा शॉर्टकट देखील उघड करते. ज्यामुळे सिरीज अत्यंत संबंधित आणि शेअर करण्यायोग्य बनते. ॲमेझॉन ॲड्सचे डायरेक्टर गुलशन वर्मा पुढे म्हणाले, "'फेमसली फिट' प्रेक्षकांना तंदुरुस्तीच्या वास्तविक बाजूच्या जवळ आणण्यासाठी तयार करण्यात आली आहे. जिथे सेलिब्रिटी दिनचर्या दैनंदिन शिस्तीत पूर्ण करतात. या सिरीजची मांडणी अस्सल असल्याने प्रत्येक क्षण अनस्क्रिप्टेड ठेवून, हा शो अधिक संबंधित आणि आकर्षक पाहण्याचा अनुभव निर्माण करतो. त्याच वेळी, ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर प्रेक्षक खऱ्या अर्थाने ज्या कंटेंटशी जोडले जातात. त्यामध्ये ब्रँडला कथेचा भाग बनण्याचा एक नैसर्गिक मार्ग मिळतो."

आपला उत्साह व्यक्त करताना, सोफी चौधरी म्हणाली, "तंदुरुस्ती हा कायमच माझ्या जीवनशैलीचा अविभाज्य भाग राहिला आहे आणि 'फेमसली फिट' चे सूत्रसंचालन हा त्याचा नैसर्गिक विस्तार असल्यासारखे वाटले. मला या शो'बद्दल आवडणारी गोष्ट म्हणजे तो अतिशय वास्तविक आणि अनफिल्टर्ड आहे. यामध्ये केवळ व्यायामाबद्दलची चर्चा नाही नसून त्यामागील शिस्त आणि मानसिकता समजून घेण्याबद्दल प्रयत्न आहे. प्रत्येक सेलिब्रिटी त्यांच्या तंदुरुस्तीच्या प्रवासाला स्वतःच्या अनोख्या पद्धतीने कसे पाहतो हे पाहणे आश्चर्यकारकपणे प्रेरणादायी आहे. बरीच स्पष्टता, गोंधळ आणि मजा आहे. प्रेक्षक कधी एकदा ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर हा शो पाहतात, असे झाले आहे."










## थोडक्यात पण महत्वाचे



### बार्टीच्या मनमानी कारभाराविरोधात NSUI चे आक्रमक आंदोलन

पुणे (आरंभ पर्व) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) कडून राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सुरू असलेल्या गंभीर अनियमितता, मनमानी कारभार आणि विद्यार्थ्यांच्या तक्रारींकडे होत असलेल्या जाणीवपूर्वक दुर्लक्षाच्या निषेधार्थ आज महाराष्ट्र प्रदेश NSUI चे प्रदेश महासचिव ॲड. कृष्णा साठे यांच्या नेतृत्वात बार्टी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करत आक्रमक आंदोलन करण्यात आले. यावेळी, प्रदेश सचिव आदेश सरोदे, सुश्मिता हरणे, पुणे जिल्हाध्यक्ष ॲड.अभिजित जिल्हा उपाध्यक्ष सिद्धांत जांभुळकर, जिल्हा महासचिव रविराज कांबळे, सुशांत दसाडे, प्रसाद चव्हाण, प्रशांती नेजदार, आदित्य भिसे, सुयोग बनसोडे, ओम भवर सारंग लांडगे, यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनादरम्यान बार्टी प्रशासनाच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. स्पर्धा परीक्षार्थींच्या भवितव्याशी खेळ केला जात असल्याचा आरोप करत "विद्यार्थ्यांना न्याय द्या", "मनमानी कारभार बंद करा" अशा घोषणा देण्यात आल्या. बार्टीमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण प्रक्रियेत शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आलेल्या HIERARCHY चा अवलंब केला जात नसून निवड प्रक्रियेमध्ये मनमानी पद्धतीने निर्णय घेतले जात आहेत.

### श्रीराम दरबार मध्ये श्रीराम नवमी उत्साहात साजरी

पुणे (आरंभ पर्व) : जय श्रीराम चा जयघोष, श्रीराम जय राम जय जय राम मंत्राचा अखंड मंत्रोच्चार, विविध रामभक्तीपर गीतांचा जागर आणि हजारो राम भक्तांची उपस्थिती अशा भक्तिमय वातावरणात कोंढवा खुर्द येथील श्री संकट हरण महादेव मंदिराच्या आवारातील श्रीराम दरबार मध्ये श्रीराम नवमी अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली. पवन बंसल आणि सुनीता बंसल यांनी आपला नातू मास्टर सरस बंसल याच्या स्मृतीनिमित्त कोंढवा खुर्द मधील श्री संकट हरण महादेव मंदिरामध्ये 2021 रोजी श्रीराम दरबार या मंदिराची स्थापना केली.या मंदिरामध्ये श्रीराम सेवा समितीच्या माध्यमातून यंदा सहाव्या वर्षी श्रीराम नवमी उत्सव थाटामाटात साजरा करण्यात आला. पवन बंसल, सुनीता बंसल, ईश्वरचंद गोयल, जयभगवान गोयल, पवन चमेडिया, गुंजन तवाल ,नरेंद्र गोयल ,प्रेमचंद मित्तल ,सतीश अग्रवाल ,योगेश जैन, गोयल गंगा ग्रुपच्या गीता गोयल, विक्रम बंसल रुची नरेंद्र गोयल, माजी नगरसेवक तानाजी लोणकर यांच्यासह हजारो राम भक्त या महोत्सवामध्ये सहभागी झाले होते.

# भारताला विकसित राष्ट्र करण्यासाठी 'वंदे मातरम ' प्रेरणा देत राहील

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**



मातृभूमीच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी 'वंदे मातरम ' ने लाखो भारतीयांना प्रेरणा दिली आणि यापुढेही भारताला विकसित राष्ट्र करण्यासाठी हे राष्ट्रगान प्रेरणा देत राहील. या गीताची प्रेरणा घेत स्वातंत्र्य लढ्यातील स्वातंत्र्य सैनिक व क्रांतिकारकांनी दिलेले त्याग, समर्पण देश कधीच विसरू शकणार नाही. त्यांचे योगदान स्मरणात ठेवणे आपले कर्तव्यच आहे. असे प्रतिपादन राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी येथे केले.

राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आणि राजगुरुनगर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद दिवस आणि वंदे मातरम सार्ध शताब्दी १५० वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आमदार बाबाजी काळे, केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाचे सचिव विवेक अग्रवाल, सहसचिव समर नंदा, सांस्कृतिक कार्य व मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ, उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले, हुतात्मा राजगुरू यांच्या जन्म आणि पदस्पशनि पावन झालेली राजगुरुनगर आणि येथील माती आपल्याला पदोपदी प्रेरणा देणारी आहे. हुतात्मा राजगुरू स्मारक विकास आराखडा हा केवळ मूलभूत सुविधा आणि बांधकामाचा आराखडा नसून देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांचे स्मारक आहे.

**आशिष शेलार**

भारतीयांसाठी ते प्रेरणास्त्रोत, प्रेरणास्थळ आहे, त्यामुळे या आराखड्याकरिता करण्यात येणाऱ्या भूसंपादनामुळे बाधित होणाऱ्या नागरिकांना मोबदला देताना तो भरीव स्वरूपात देण्यात येईल, आमदार काळे यांनी आपल्या भाषणात, हुतात्मा राजगुरू स्मारक विकास व त्यामाध्यमातून होणाऱ्या बाधित आराखड्याकरिता भूसंपादन आणि नागरिकांच्या घराचा प्रश्न सोडवावा. तसेच, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान विकास आराखड्याच्या कामांसाठी सहकार्य करावे, अशी मागणी केली. यावेळी मान्यवरांची समायोचीत भाषणे झाली. कार्यक्रमापूर्वी ऐतिहासिक हुतात्मा राजगुरू जन्मस्थळ वाडा व स्व. बाळासाहेब आपटे वाडा येथे आशिष शेलार यांनी भेट देऊन पाहणी केली.





## आरटीई कायद्यात सुधारणा करण्याची नागरिक सोशल फाउंडेशनची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राईट टू एज्युकेशन ॲक्ट, 2009 मध्ये आवश्यक सुधारणा करून शिक्षण व्यवस्था अधिक समावेशक, न्याय्य आणि प्रभावी करण्यासाठी नागरिक सोशल फाउंडेशनतर्फे विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने अनुदान, अंतर बदल, अल्पसंख्याक संस्थांना दिलेली सूट यांचा समावेश असल्याची माहिती नागरिक सोशल फाउंडेशनचे सीए सर्वेश मेहेंदळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी संस्थेचे संचालक प्रीतम थोरवे, अमेय सप्रे उपस्थित होते. पुढे बोलतान सीए सर्वेश मेहेंदळे म्हणाले, भारतीय संविधानातील कलम 21A नुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला मोफत व सक्तीचे शिक्षण देणे ही राज्याची जबाबदारी असल्याचे अधोरेखित करत, शिक्षण हा मूलभूत हक्क सर्वांना समानतेने मिळावा, अशी भूमिका संस्थेची आहे. शिक्षण हा मूलभूत हक्क असल्यामुळे आरटीई कायदा कोणत्याही अपवादाशिवाय सर्व शैक्षणिक संस्थांवर, अल्पसंख्याक संस्थांसह, समानपणे लागू करावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. धार्मिक शिक्षण देणाऱ्या शाळांना सध्या दिलेली सूट (Section 1(5)) रद्द करून संपूर्ण शिक्षण व्यवस्थेत एकसमान आणि न्याय्य धोरण लागू करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. आरटीई अंतर्गत शाळांना दिले जाणारे अनुदान वेळेत न मिळाल्यास, थकीत रकमेवर व्याजासह पेमेंट करण्याची स्पष्ट कायदेशीर तरतूद करण्याची मागणी करण्यात आली. सध्याचा 1 किमी/3 किमी अंतर निकष शहरांच्या वाढत्या लोकसंख्येनुसार अपुरा ठरत असल्याने, A+, A, B, C, D ग्रेडिंग प्रणालीवर आधारित नवीन निकष तयार करून ग्रामीण व शहरी भागांसाठी स्वतंत्र नियम निश्चित करावेत, असे सुचविण्यात आले. समाजातील सर्व घटकांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे आवाहन नागरिक सोशल फाउंडेशनतर्फे करण्यात आले आहे.

## रामनवमी निमित्ताने धायरी परिसरात भव्य शोभायात्रेचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



रामनवमीनिमित्त धायरी परिसरात भगवान श्रीरामांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या यात्रेत स्थानिक नागरिक, युवक व महिला मोठ्या उत्साहाने पारंपारिक वेशभूषा परिधान करून सहभागी झाले. या शोभायात्रेमुळे धायरीत प्रचंड उत्साहाचे, भक्तिपूर्ण आणि चैतन्यमय वातावरण निर्माण झाले. सरकार प्रतिष्ठान, अखिल नरवीर तानाजी मालुसरे पथ श्रीराम नवमी उत्सव समितीच्या वतीने ही शोभायात्रा आयोजित करण्यात आली. लक्ष्मी मंगेश कदम यांच्या नेतृत्वाखाली आशिष बेनकर, अक्षय उंदरे, गणेश साखरे, सचिन सोनवणे, संदीप स्वामी, गणेश पासलकर, गणेश खामकर, अजिंक्य जाधव यांनी ही यात्रा भव्य आणि देखण्या स्वरूपात पार पाडली.

## असेंट मेडिटेकचा पुण्यात भव्य वितरक मेळावा; भागीदारी अधिक मजबूत


### १८० वितरकांचा सहभाग; फ्लेमिंगो ब्रँडच्या विस्तारासाठी धोरणात्मक चर्चा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**





फ्लेमिंगो ब्रँडमागील असेंट मेडिटेक लिमिटेडने पुण्यात भव्य वितरक मेळावा आयोजित करत आपले वितरक नेटवर्क अधिक मजबूत करण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. या मेळाव्यात प्रदेशभरातील सुमारे १८० वितरक सहभागी झाले होते. कार्यक्रमास संस्थापक वसीएमडी राजीव मिस्त्री, प्रेसिडेंट – सेल्स अँड मार्केटिंग विवेक भटनागर तसेच पश्चिम विभाग डीजीएम सचिन जोसाळकर उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनीच्या भविष्यातील विस्तार आणि धोरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या मेळाव्यात पुणे व आसपासच्या बाजारपेठेत वितरण साखळी अधिक सक्षम करणे, ग्राहकांपर्यंत पोहोच वाढवणे आणि आगामी आर्थिक वर्षासाठी नियोजन यावर भर देण्यात आला. फ्लेमिंगो ब्रँडने वेदना व्यवस्थापन, ऑर्थोपेडिक सपोर्ट आणि हेल्थकेअर उत्पादनांमध्ये आपले मजबूत स्थान निर्माण केले असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. कंपनीने आपल्या प्रमुख वितरकांचा विशेष सन्मान केला. विशेषतः नितीन डिस्ट्रीब्युटरचे राहुल भंडारी यांचा १३ वर्षांच्या सहकार्याबद्दल गौरव करण्यात आला. वितरकांशी असलेला विश्वास आणि दीर्घकालीन संबंध हीच कंपनीची खरी ताकद असल्याचे नेतृत्वाने नमूद केले. मजबूत नेटवर्क आणि स्पष्ट धोरणात्मक दृष्टीकोनाच्या जोरावर असेंट मेडिटेक पुणे बाजारपेठेत आणखी विस्तार करण्यास सज्ज असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.









दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.